RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष १, अंक ३०(२)] सोमवार, मे ११, २०१५/वैशाख २१, शके १९३७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये १५.००

### असाधारण क्रमांक ६७

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**

**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**महसूल व वन विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ११ मे २०१५

**अधिसूचना**

**खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७.**

क्रमांक गौखनि. १०/२०१२/प्र.क्र.६०३/ख.—खाण व खनिज (विकास व विनियमन) अधिनियम, १९५७ (१९५७ चा ६७) याच्या कलम १५ ची पोट-कलमे (१) आणि (३) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या आणि त्याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन याद्वारे महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम करीत आहे :—

१. या नियमांना महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) (सुधारणा) नियम, २०१५ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य नियम" असा करण्यात आला आहे) यांच्या नियम २ मधील खंड (ण) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(ण-१) 'अनुसूची' याचा अर्थ या नियमांसोबत जोडलेली अनुसूची असा आहे."

३. मुख्य नियमांच्या नियम ४६ मध्ये.—

(क) उप नियम (एक) च्या ऐवजी पुढील उप नियम दाखल करण्यात येईल :—

"(एक) पट्टेदार हा, अनुसूची एकमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरानुसार पट्टयाने दिलेल्या क्षेत्रातून काढलेल्या गौण खनिजावर स्वामित्वधन भरील :

परंतु, अशा दरांमध्ये, तीन वर्षांतून एकदाच सुधारणा करता येईल :

परंतु, आणखी असे की, ज्यावेळी जमिनीच्या एखाद्या भूखंडाचा विकास करताना मातीचे उत्खनन करून ती माती त्याच भूखंडाच्या सपाटीकरणाकरिता वापरली जाईल किंवा ती अशा भूखंडाच्या विकासाच्या प्रक्रियेतील कोणत्याही कामासाठी वापरली जाईल, त्यावेळी अशा मातीवर स्वामित्वधन भरले जाणार नाही ;"

(ख) उप नियम (पाच) मधील "शासनाकडून वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल असे" या मजकुराऐवजी "अनुसूची दोन मधील विनिर्दिष्ट दरानुसार" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

४. मुख्य नियमांच्या नियम ५९ मधील उप नियम (१) मध्ये "शासनाने वेळोवेळी विनिर्दिष्ट केलेल्या दराने गणना केलेल्या" या मजकुराऐवजी "अनुसूची एकमधील विनिर्दिष्ट दरानुसार" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

५. मुख्य नियमांच्या अखेरीस पुढील अनुसूच्या दाखल करण्यात येतील :—

## अनुसूची एक

स्वामित्वधनाचे दर

[नियम ४६ (एक) आणि ५९ (१) पहा]

| अ.क्र. (१) | गौण खनिजे (२) | स्वामित्वधनाचे दर (३) |
|---|---|---|
| १ | बांधकाम साहित्य म्हणून वापरण्यात येणारा चुना तयार करण्यासाठी भट्ट्यांमध्ये वापरण्यात येणारी चुनखडी व शिंपल्यापासून केलेला चुना. | रुपये ४०० प्रति ब्रास |
| २ | उत्खननाद्वारे किंवा गोळा करून काढलेले सर्व दगड मग त्याचा आकार केवढाही असो आणि दगडाची भूकटी. | रुपये ४०० प्रति ब्रास |
| | (क) बांधकामासाठी वापरण्यात येणारा जांभा दगड (लॅटराईट स्टोन) | रुपये १०० प्रति ब्रास |
| ३ | (क) उत्खननाद्वारे काढलेले किंवा गोळा केलेले गोटे, बारीक खडी, मुरूम, कंकर | रुपये ४०० प्रति ब्रास |
| | (ख) केवळ बॉलमिल्सच्या प्रयोजनाकरिता वापरण्यात येणारे चॅल्सेडोनी खडे | रुपये २००० प्रति ब्रास |
| | (ग) पुढील प्रयोजनाकरिता वापरण्यात न येणारी सर्वसामान्य वाळू—<br>(एक) सिरामिक किंवा मृतिकाशिल्पे तयार करण्याच्या प्रयोजनार्थ<br>(दोन) धातुशास्त्रीय प्रयोजनार्थ<br>(तीन) दृष्टिविषयक प्रयोजनार्थ<br>(चार) कोळसा खाणीमध्ये साठवून ठेवण्याच्या प्रयोजनार्थ<br>(पाच) सिल्व्हीक्रेट सिमेंट तयार करण्यासाठी<br>(सहा) मातीची भांडी व काच सामान तयार करण्यासाठी. | (१) मुंबई महानगर प्रदेश क्षेत्राकरिता रुपये ८०० प्रति ब्रास.<br>(२) मुंबई महानगर प्रदेश क्षेत्र वगळून इतर क्षेत्राकरिता रुपये ४०० प्रति ब्रास. |
| ४ | कौले (मंगलोरी किंवा अन्य कोणत्याही प्रयोजनाची) तयार करण्यासाठी वापरण्यात येणारी साधी चिकणमाती. | रुपये ४०० प्रति ब्रास |
| ५ | अंतर्गत बंधारे, रस्ते, लोहमार्ग व इमारती यांचे बांधकाम करताना भरणा करण्यासाठी/भूपृष्ठ सपाट करण्यासाठी वापरण्यात येणारी साधी माती. | रुपये ४०० प्रति ब्रास |
| ६ | बांधकामाचे साहित्य म्हणून वापरण्यात येते, त्यावेळी पाटीचा दगड किंवा नरम खडक | रुपये ४०० प्रति ब्रास |
| ७ | विटा तयार करण्याच्या व इतर प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी साधी माती, गाळ व सर्व प्रकारची चिकणमाती, इत्यादी. | रुपये १६० प्रति ब्रास |
| ८ | फुलरची माती किंवा बेटोनाईट | रुपये १,०२४ प्रति ब्रास |
| ९ | सजावटीच्या प्रयोजनासाठी वापरावयाचे इतर सर्व प्रकारचे दगड (ग्रॅनाईट वगळून) | रुपये १,९२० प्रति ब्रास |
| १० | इतर सर्व गौण खनिज (ग्रॅनाईट वगळून). | रुपये ४०० प्रति ब्रास |

## अनुसूची दोन

ठोकबंद भाडे

[नियम ४६ (पाच) पहा]

सर्व गौण खनिजे (ग्रॅनाईट वगळून) . . रुपये ६,००० प्रति हेक्टर किंवा त्याच्या भागासाठी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**माधव काळे,**
शासनाचे उप सचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 11th May 2015.

### *NOTIFICATION*

MINES AND MINERALS (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1957.

No. Gaukhani. 10/1012/C.R. 603/kh.—In exercise of the powers conferred by sub-sections (*1*) and (*3*) of section 15 of the Mines and Minerals (Development and Regulation) Act, 1957 (67 of 1957) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Minor Mineral Extraction (Development and Regulation) Rules, 2013, as follows namely :—

1. These rules may be called the Maharashtra Minor Mineral Extraction (Development and Regulation) (Amendment) Rules, 2015.

2. In rule 2 of Maharashtra Minor Mineral Extraction (Development and Regulation) Rules, 2013 (hereinafter referred to as "the Principal Rules") after clause (*o*), the following clause shall be inserted, namely :—

"(*o-1*) 'Schedule' means the Schedule appended to these rules."

3. In rule 46 of the Principal Rules :—

(*a*) for the sub-rule (*i*), the following sub-rule shall be substituted, namely :—

"(*i*) The lessee shall pay royalty on minor minerals removed from the leased area at the rates specified in Schedule I :

Provided that, such rates shall be revised once in every three years :

Provided further that, no royalty shall be required to be paid on earth which is extracted while developing a plot of land and utilized on the very same plot for land levelling or any work in the process of development of such plot";

(*b*) in the sub-rule (*v*), for the words "as specified by the Government, from time to time," the words "at the rate specified in Schedule II" shall be substituted.

4. In rule 59 of the Principal Rules, in sub-rule (1), for the words "calculated at the rate specified by the Government, from time to time," the words "at the rate specified in Schedule I" shall be substituted.

5. To the Principal Rules, the following Schedules shall be added at the end, namely :—

*Schedule-I*

Rates of Royalties

[*See* rule 46 (*i*) and 59(1)]

| Sr. No. (1) | Minor Minerals (2) | Rate of Royalty (3) |
|---|---|---|
| 1 | Limestone and lime shell used in kilns for manufacture of lime used as building material. | Rs. 400 per brass |
| 2 | All Stones removed irrespective of size including stone dust either by excavation or collection. | Rs. 400 per brass |
| | (*a*) Laterite Stone used for building purpose (Jambha Stone) | Rs. 100 per brass |
| 3 | (*a*) Shingle, Gravel, Murum, Kankar all removed either by excavation or collection. | Rs. 400 per brass |
| | (*b*) Chalcedony pebbles used for ball mill purposes only | Rs. 2,000 per brass |

| (1) | (2) | (3) |
|---|---|---|
| | (*c*) Ordinary sand not used for the following purposes, namely :—<br>(*i*) Purposes of refractory and manufacture of ceramic.<br>(*ii*) Metallurgical purposes<br>(*iii*) Optical purposes<br>(*iv*) Purposes of stowing in coal mines<br>(*v*) For manufacture of silvicrete cement<br>(*vi*) For manufacture of pottery and glass | (*i*) Rs. 800 per brass in the area of Mumbai Metropolitan Region.<br>(*ii*) Rs. 400 per brass in the area other than Mumbai Metropolitan Region. |
| 4 | Ordinary clay, when used for manufacture of tiles (Mangalore pattern or any other purpose). | Rs. 400 per brass |
| 5 | Ordinary earth used for filling or levelling purpose in construction of embankment, Roads, Railways and Building. | Rs. 400 per brass |
| 6 | Slate and shale when used for building material. | Rs. 400 per brass |
| 7 | Earth, Silt and all types of clays etc. used for manufacture of bricks and other purposes. | Rs. 160 per brass |
| 8 | Fullers earth or Bentonite | Rs. 1,024 per brass |
| 9 | All stones (excluding Granite) intended for use for decorative purposes. | Rs. 1,920 per brass |
| 10 | All other minor minerals (excluding Granite) | Rs. 400 per brass |

*Schedule - II*

Dead Rent

[*See* rule 46 (*v*)]

All Minor Minerals (Excluding Granite) . . Rs. 6000 per hectare or portion thereof.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MADHAV KALE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.